रयत शिक्षण संस्थेचे,
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.

हिंदी आणि मराठी साहित्यावरील जागतिकीकरणाचा प्रभाव
एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र अहवाल

दि.२१/०४/२०२२

महाविद्यालयाचा मराठी विभाग, हिंदी विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता कक्ष (IQAC) यांच्या संयुक्त विद्यमाने 'हिंदी आणि मराठी साहित्यावरील जागतिकीकरणाचा प्रभाव' या विषयावरील एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र बुधवार दि.२० एप्रिल २०२२ रोजी संपन्न झाले. ऑनलाईन पद्धतीने या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ठीक १०.वा. रयत गीताने चर्चासत्राची सुरूवात झाली. सुप्रसिद्ध हिंदी लेखिका मधु कांकरिया कलकत्ता यांनी या चर्चासत्राचे उद्घाटन केले व हिंदी विषयाच्या बीजभाषण केले. तर मराठी विषयाचे बीजभाषण शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील नामवंत लेखक, समीक्षक प्रा.डॉ.रणधीर शिंदे यांनी केले. दोन्ही विषयाच्या बीजभाषकांनी साहित्यावर झालेला जागतिकीकरणाचा परिणाम सविस्तर मांडला. या दोन्ही बीजभाषणाचा उपयोग संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक यांना होणार आहे. या उद्घाटन सत्राचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो.डॉ.व्ही.व्ही.किल्लेदार होते. यावेळी कांकरिया मॅडम यांचा परिचय हिंदी विभागप्रमुख डॉ.आर.सी.पाटील यांनी करून दिला तर प्रा.डॉ.रणधीर शिंदे सरांचा परिचय मराठी विभागप्रमुख डॉ.सिंधू आवळे यांनी करून दिला. यावेळी सूत्रसंचालन प्रा.नीता साठे यांनी केले तर आभार डॉ. एन.ए.देसाई यांनी व्यक्त केले.

या चर्चासत्राचे दुसरे सत्र विषयविवेचनाचे होते. यामध्ये सुरूवातीला 'जागतिकीकरण आणि ग्रामीण साहित्य' या विषयावर प्रा.डॉ.गिरीष मोरे यांनी साधनव्यक्ती म्हणून मार्गदर्शन केले. त्यानंतर 'जागतिकीकरण आणि दलित साहित्य' या विषयावर प्रा.डॉ.प्रशांत गायकवाड यांनी साधनव्यक्ती म्हणून मार्गदर्शन केले. तर 'जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य' हा विषय प्रा.डॉ.दीपककुमार वळवी यांनी मांडला. या दुसऱ्या सत्राचे अध्यक्ष चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी. येथील मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ.सुनील चंदनशिवे होते. यासत्राचे सत्र संयोजन डॉ. महेश रणदिवे यांनी केले. चर्चासत्राचे तिसरे सत्र हे खुले शोधनिबंध वाचनाचे होते. यामध्ये विविध महाविद्यालयातील संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक यांनी आपले शोधनिबंध वाचले. एकूण २४ शोधनिबंध या चर्चासत्रात सादर करण्यात आले. या सत्रासाठी अध्यक्ष म्हणून गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालयातील प्रा.डॉ.राजश्री पोवार यांनी मार्गदर्शन केले. तर सत्र संयोजन प्रा. अंकुश घुले यांनी केले.

चर्चासत्राच्या समारोप समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी येथील हिंदी विभागप्रमुख प्रा.डॉ.डी.आर.भोसले उपस्थित होते. डॉ.भोसले यांनी जागतिकीकरणाचा साहित्यावर झालेला बरा-वाईट परीणाम आपल्या मनोगतातून मांडला. या समारोप समारंभाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे चेअरमन प्रा.डॉ.समाधान पवार यांनी मार्गदर्शन केले. या समारोप समारंभाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय हिंदी विभागप्रमुख डॉ.आर.सी.पाटील यांनी करून दिला. आभार मराठी विभागप्रमुख डॉ.सिंधू आवळे यांनी व्यक्त केले. तर सूत्रसंचालन प्रा.नीता साठे यांनी केले.

डॉ.सिंधू आवळे
मराठी विभाग प्रमुख

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE
KOLHAPUR